**<u>उत्तराखंडची दुर्घटना नैसर्गिक आपत्ती की चीनचा घातपात?</u>**

**<u>चीनचे पर्यावरण युध ?</u>**

काही दिवसापूर्वी उत्तराखंड मध्ये एक हिमकडा किंवा दरड कोसळली आणि त्या खालती दबून अनेकांचा मृत्यू झाला. याशिवाय तिथे असलेले एक धरण फुटले आणि त्यामुळे नदीकाठाला एकदम अचानक पूर आला आणी नदीकाठी राहणारे काही वाहुन गेले. जे घडले ती नैसर्गिक आपत्ती होती की की घडवला गेलेला घातपात होता याचे संशोधन करण्याकरता डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन यांचे सायंटिस्ट या भागांमध्ये आता संशोधन करण्यात गुंतलेले आहे.त्याना तांतडीने हेलिकॉप्टरने या भागात पाठवले गेले.

हा अपघात नैसर्गिक होता की आपल्या देशाच्या शत्रूंनी घडवलेला होता ? कारण शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की फेब्रुवारीच्या महिन्यामध्ये अशाप्रकारे हिम कडा कोसळणे किंवा दरड कोसळणे हे जवळजवळ अशक्य आहे. कारण हीमकडा कोसळण्याकरता लागणारी भौगोलिक आणी नैसर्गित कारणे पहिल्या पाहणीमधे दिसुन येत नाही. हिमकडा कोसळण्याकरता अचानक ऊन पडुन तापमान वाढावे लागते. सध्या तिथे असलेले तापमान हे मायनस 20 डिग्री सेंटीग्रेड एवढे आहे. तिथे नवीन बर्फ सुद्धा पडलेला नव्हता .म्हणून अशा अवस्थेमध्ये हीमाकडा कोसळणे हे जवळजवळ अशक्य आहे .म्हणून एक शंका निर्माण होते की हा घातपात होता का ? कारण अशा प्रकारचे घातपात लांब राहून सुद्धा केले जाऊ शकते .चीनने आपल्या सैनिकांच्या/हस्तकांच्या मदतीने अशा प्रकारचा स्फ़ोट केला होता का.या भागात गढवाल रेजीमेंटचे आणी ईतर अनेक सैनिक राहतात. त्या भागात राहणाऱ्या काही सेवानिवृत्त सैनिकांनी तिथे स्फ़ोट झाल्याचा आवाज ऐकला आणि हा स्फ़ोट होण्याचा आवाज नैसर्गिक नव्हता, अश्या पोस्ट भुतपुर्व सैनिकांच्या सोशल मिडीयावर येत होत्या. म्हणून असे वाटते की हा स्फ़ोट केला गेला असावा. अर्थातच यावर पूर्णपणे चौकशी

करावी लागेल ,जी डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन यांचे सायंटिस्ट करत आहेत.  एवढे नक्की की अशा प्रकारचे घातपात चीनने या आधी केले आहेत.

**अजुन एका पुराची  दहशत**

२५ जुलै २०१३ची बातमी. वाढत्या पाणीपातळीमुळे 2005 मध्ये हिमाचलमध्ये हाहाकार माजवणाऱ्या पारछू सरोवराने पुन्हा एकदा धोक्याची पातळी गाठली . सरोवराच्या भिंतीला तडे गेल्यास सतलज नदीकाठच्या सुमारे 24 गावांमध्ये धोकादायक परिस्थिती निर्माण झाला. चीनच्या तिबेटमध्ये असलेल्या पारछू सरोवराचे आकारमान 34 हेक्टरवरून थेट 100 हेक्टरपर्यंत वाढले . सरोवरात बाहेरून येणाऱ्या प्रवाहाचा वेग जास्त वाढला . पाण्याचा विसर्ग झाला नाही. यामुळे सरोवरातील पाण्याची पातळी वाढली आणी अचानक सरोवराचा बांध फ़ुटला आणी हिमाचलमध्ये हाहाकार माजला.

याप्रकरणाबाबत चर्चेसाठी गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाला सरोवराबाबतची सर्व माहिती या पुढे दिली जाईल, असे आश्‍वासन चीनने दिले होते. पण त्याचे पालन केले नाही. तिबेटमध्ये वाहणाऱ्या पारछू नदीवर 2004 मध्ये झालेल्या भूस्खलनामुळे हे सरोवर तयार झाले होते. हिमनग वितळल्यामुळे पारछू नदीवरील या सरोवरात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा जमा झाला . या सरोवराचे आकारमान वाढले असल्याचे रिमोट सेंसिंग सॅटेलाइटद्वारा घेण्यात आलेल्या छायाचित्रातून दिसून आले आहे. आकारमानात वाढ झाल्यामुळे सतलज नदीकाठचे लोक भयभीत झाले.

**चीनचे पर्यावरण युध ?**

२०१३ मध्ये उत्तराखंडामध्ये आलेल्या नैसर्गिक प्रकोपानंतर सर्वत्र हाहाकार उडाला .आकाश (ढगफ़ुटी) फ़ुटल्यामुळे मुसळधार पावसाने मदतकार्यात व्यत्यय आणले. आभाळ सतत भरून आले. ढगांमुळे आसपासचा प्रदेश

दिसेनासा झाला. पावसामुळे  नद्या भरून वाहायला लागल्या, रस्ते खचले, पुल वाहुन गेले आणि हजारो लोक मृत्युमुखी पडले.कोसळलेल्या दरडीं खाली, मातीच्या ढिगा-याखाली अडकलेल्यांची सुटका करावी लागली.ईतका  प्रकोप चीन मुळे तर नाही झाला?एका व्रुत्तपत्राप्रमाणे चीनने क्लाऊड सिडिग केल्यामुळे हे झाले असावे.परंतु देशात या द्रुष्टी कोनातुन फ़ारशी चौकशी केली गेली नाही. ब्रह्मपुत्रेचे चीन मधल्या धरणांचे पाणी अचानक सोडले तर काय होइल याची ही रगींत तालीम तर नाही?

.ब्रह्मपुत्रेच्या वळणाजवळ  जर मोठे धरण बांधले, तर ती ईशान्य भारताच्या डोक्यावरील टांगती तलवार ठरेल. चीनसारख्या बेभरवशी देशाकडून भारतावर कुरघोडी करण्यासाठी धरणात ले पाणी अचानक सोडण्याची आगळीक केली जाणारच नाही, याची शाश्वती नाही. तसे झाले तर येणाऱ्या पाण्याच्या लोंढय़ामुळे अरुणाचल प्रदेश आणि आसामचा बहुतांश भागाला मोठा धोका होण्याची शक्यता  तज्ज्ञांकडून व्यक्त केली गेली आहे.म्हणुन चीनवरची टेहाळणी वाढण्याची  गरज आहे.

**<u>पुलाचे पुनरनिर्माण केले</u>**

चीनने ही हिमकडा कोसळण्याकरता क्षेपणास्त्राचा मारा केला असू शकतो असे काही पोस्ट सोशल मीडिया वरती येत आहेत. झालेल्या अपघातात सीमावर्ती भागाला चीन कडे जाणाऱ्या रस्त्यावरचा एकमेव पुल वाहून गेला. भारतीय सैन्य सीमेवर जाण्याकरता या पुलाचा वापर करत असे. म्हणूनच सीमावर्ती चीनच्या अतिक्रमणाला प्रत्युत्तर देण्याकरता सैन्याचे दळणवळणाचे साधने थोडावेळ थांबवणे हा सुद्धा चीनच्या एक उद्देश असू शकतो. अर्थातच भारताच्या भारतीय सैन्याच्या इंजिनिअर्सनी लगेच त्या् पुलाचे पुनरनिर्माण केले आहे. त्यामुळे चिनी जरी काही लष्करी कारवाई केली तरी त्याकरता भारतीय सैन्य हे तयार असेल.

**<u>देशाच्या प्रगतीला डोंगराळ भागांमध्ये अजून एक अडथळा</u>**

मात्र सध्याच्या अपघातात ही चौकशी केली जात आहे.  या वेळेला सुद्धा वाटते की हा घातपात चीनने घडवला असावा. चीन असे का करत आहे? यामुळे या पर्यावरण वाद्यांना जोर मिळेल आणि ते आरडाओरडा सुरू करतील आणि या भागांमध्ये जी धरणे आणि इतर विकासाची कामे केली जात आहेत ती थांबवली जातील. ज्यामुळे देशाच्या प्रगतीला डोंगराळ भागांमध्ये अजून एक अडथळा निर्माण होईल. अर्थातच पद्धतशीरपणे या बाबीचा तपास केला जावा आणि यावरती सुद्धा संशोधन केले जावे व योग्य निर्णय घतला जावा. ज्यामुळे जर चीनने भारता विरुध्द जर पर्यावरण युद्ध सुरू केले असेल तर आपण लगेचच प्रत्युत्तर देण्याकरता तयार राहू.